## जाहीर सुचना/प्रसिध्दी पत्रक

क्र.2011 गोशा/1/कावि/2015
जिल्हा दंडाधिकारी कार्यालय, हिंगोली.
दिनांक :30.11.2011

महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एसपीपी/1099/3096/प्र.क्र.152/पोल-10, दिनांक 09 मे 2000 तसेच फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 25(3) नुसार हिंगोली जिल्हयातील न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी यांचे न्यायालयातील फौजदारी विभागाचे विशिष्ट खटल्यांचे कामासाठी 05 (पाच) विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्त्यांचे पॅनल तयार करण्यासाठी खालील नमूद अटी व शर्तीवर हिंगोली जिल्हयातील वकील/विधीज्ञ यांचेकडून सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

1. विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता या पदासाठीचा अर्जदार हा भारताचा नागरीक असावा.
2. सदर पदासाठी अर्जदाराचे वय 33 वर्षापेक्षा अधिक असु नये
3. सदर पदासाठी अर्जदार मान्यताप्राप्त विधी शाखेची पदवी धारण करणारा असावा व वकील म्हणून नोंदणी केलेला व कमीत कमी 05 वर्षे फौजदारी प्रकरणे चालवण्याचा वकीलीचा अनुभव असावा.
4. विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांची नेमणूक ही तात्पुरत्या स्वरुपाची असून कोणतीही पूर्वसुचना न देता केंव्हाही संपुष्टात आणण्यात येईल.
5. विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांच्या नेमणूका फौजदारी प्रक्रिया संहिता, 1973 चे कलम 25(3) मधील तरतुदीनुसार विशिष्ट फौजदारी प्रकरणासाठी असली तरी, त्यास नेमून दिलेल्या न्यायालयातील बोर्डावरील दैनंदिन फौजदारी प्रकरणे हाताळणे आवश्यक राहिल.
6. विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्त्याचे काम असमाधानकारक असल्याचे निष्पन्न झाल्यास किंवा त्याचेविरुध्द तक्रार प्राप्त झाल्यास त्यांना कोणतीही पूर्व सुचना न देता त्यांची तात्पुरत्या स्वरुपातील नियुक्ती रदद करण्यात येईल.
7. तात्पुरत्या स्वरुपातील पॅनलवर निवड झालेल्या विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्त्याची जिल्हयातील कोणत्याही न्यायालयात काम करण्याची तयारी असावी. त्यांना अन्य कोणत्याही प्रकरणात खाजगी व्यक्तीतर्फे खटल्यात काम करता येणार नाही.
8. विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्त्याने चालवलेल्या फौजदारी प्रकरणांच्या कामाबाबतचा मासिक अहवाल सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता, हिंगोली यांचे कडे सादर करावा.
9. सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता, हिंगोली हे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्त्यांचे पर्यवेक्षी व नियंत्रण अधिकारी असतील व त्यांचे सूचनांचे व आदेशांचे पालन करणे हे निवड झालेल्या तात्पुरत्या स्वरुपातील पॅनलवरील विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्त्यांना बंधनकारक असेल.

10. विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्त्या म्हणून शासनाचा पूर्णवेळ सेवक म्हणून नियुक्ती नसल्याने तात्पुरत्या स्वरुपाचे पॅनलवर कितीही वर्षे काम पाहिले तरी त्यांना नियमित सहाय्यक सरकारी अभियोक्ता पदावर हक्क सांगता येणार नाही. तसेच या कालावधीचा फायदा अन्य कोणत्याही शासकीय पदाचे नियुक्तीकामी वयोमर्यादेतील सुट म्हणून घेता येणार नाही.

11. विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्त्यांना शासकीय पदाचे कोणतेही फायदे अनुज्ञेय असणार नाहीत.

12. हिंगोली जिल्हयातील सध्या कार्यरत असलेल्या विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी या पॅनलसाठी अर्ज करण्याची आवश्यकता नाही.

13. सदर विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्त्यांना खालीलप्रमाणे मानधन मंजूर करण्यात येईल.

अ) प्रतिदिनी परिणामकारक सुनावणीसाठी व प्रतिदिनीची कमाल मर्यादा — रु. 450/-

ब) एका जामीन अर्जाच्या विरोधाकरीता — रु. 250/-

क) प्रतिदिनाची कमाल मर्यादा — रु. 700/-

टिप : एका पेक्षा जास्त सुनावणी किंवा जामीन अर्जांचे विरोधाचे काम चालवले तरी मानधनाची प्रतिदिन कमाल मर्यादा रु. 700 राहील. प्रस्तावीत तात्पुरत्या स्वरुपातील पॅनलवरील विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्तास कोणत्याही परीस्थितीत प्रतिदिन एकूण 700 पेक्षा अधिक मानधन अनुज्ञेय असणार नाही.

14. तात्पुरत्या स्वरुपात तयार करण्यात येणाऱ्या पॅनलवरील विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता पदासाठी विहीत नमुन्यातील अर्ज दिनांक 15.12.2011 रोजी कार्यालयीन वेळेत जिल्हादंडाधिकारी कार्यालय, हिंगोली (गृह शाखा) यांचे कार्यालयात पोहोचतील अशा बेताने पाठवावेत. मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

**स्वाक्षरीत/-**
**जिल्हादंडाधिकारी,** हिंगोली.

प्रतिलिपी :

1. सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता, हिंगोली यांना माहिती व प्रसिध्दीस्तव
2. सचिव, वकील संघ, हिंगोली,कळमनुरी,वसमत,सेनगाव,औढा नां. यांना माहितीस्तव.
3. या कार्यालयाचे नोटीस बोर्डवर.
4. जिल्हा माहिती अधिकारी, हिंगोली यांनी सदर जाहीर सुचनेस स्थानीक वृत्तपत्रात बातमी रुपाने प्रसिध्द करुन वृत्तपत्राचे कात्रण या कार्यालयास पाठवावे.

**अति.जिल्हादंडाधिकारी, हिंगोली.**